# मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, चंद्रपूर यांचे कार्यालय

## सुचना

## वाहन विकीचा जाहीरनामा

सर्व इच्छुक खरेदीदारास कळविण्यात येते की, जिल्हा न्यायालयाचे वाहन कमांक एम.एच.–34–9195, एम.एच.–34–9196, एम.एच.–34–9197, तिन्ही वाहनाचे मॉडेल मारूती ओमनी, नोंदणी दिनांक अनुकमे 26.02.1996, 01.03.1996,19.06. 1996 या तिन्ही वाहनांची विकी करावयाची आहे. त्यामूळे सदरहू वाहने खरेदी करणारे इच्छूक खरेदीदाराने दिनांक 10.08.2022 चे कार्यालयीन वेळेपावेतो किंवा त्यापूर्वी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश यांचे नावाने सिलबंद निविदा जिल्हा न्यायालय, चंद्रपूर येथे खालील अटी व शर्तीचे अधीन राहून सादर करावी. तसेच निविदेचे लिफाप्यावर "वाहन खरेदीबाबत निविदा" असे नमूद करावे.

### सदरचे वाहन विकीबाबतच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे

1. विकी करण्यात येणारे वाहन कमांक एम.एच.–34–9197, मॉडेल मारूती ओमनी जिल्हा न्यायालयाचे इमारतीचे मागील गॅरेज मध्ये ठेवण्यात आलेले आहे. आणि एम.एच.–34–9195, व एम.एच.–34–9196 ही दोन वाहने मा. प्रमुख जिल्हा न्यायाधिश, यांचे शासकीय निवासस्थान परीसरात ठेवण्यात आलेले आहे. सदर वाहने पाहण्याचा कालावधी निविदा सादर करण्यापूर्वीपर्यंत कामकाजाच्या दिवशी सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 वाजेपर्यंत उपलब्ध राहील. या कार्यालयाचे वरिष्ठ लिपीक (प्रोटोकॉल) किंवा सहाय्यक अधिक्षक (बांधकाम) सदरहू वाहने दाखवतील. पाहणी न करता निविदा सादर केल्यास कार्यालयाची जबाबदारी राहणार नाही.

2. ज्यांची वाहन खरेदी किंमत जास्तीची राहील त्यांचेकडून रक्कम कार्यालयात जमा केल्यानंतर त्याची रितसर पावती देवून वाहन देण्यात येईल. तसेच वाहन खरेदीदार कायदेशिररित्या सक्षम असला पाहीजे.

3. वाहने आहे त्या स्थितीमध्ये "जेथे आहे तेथून" विकणे आहे. सदरचे तिन्ही वाहनांची आर.टी.ओ. नोंदणी रद्द करण्यात आलेली असल्यामूळे वाहने हस्तातरण होणार नाही. वाहने एकदा विकी झाल्यानंतर कसल्याही प्रकारचा दावा किंवा वाद ऐकूण घेतल्या जाणार नाही. तसेच खरेदीदारास वाहन घेवून जाण्याकरीता कुठल्याही प्रकारची सुविधा पुरविल्या जाणार नाही.

4. प्रति वाहनांची निर्धारीत किंमत रू. 27,000/– आहे. इच्छुक खरेदीदाराने रू.27,000/– किंवा त्यापेक्षा जास्तीचे रकमेत खरेदी करीत असल्यास ती रक्कम नमूद करावी. तसेच निविदेसोबत आधारकार्डची छायांकीत प्रत अथवा ओळखपत्राची छायांकीत प्रत जोडणे आवश्यक राहील.

5. दिनांक 10.08.2022 चे कार्यालयीन वेळ संपेपर्यंत किंवा त्यापूर्वी निविदा स्विकारण्यात येईल. मुदतीनंतर प्राप्त निविदा विचारात घेतल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

6. उप–प्रादेशिक परिवहन अधिकारी, चंद्रपूर यांनी निश्चित करून दिलेल्या किंमतीत वाहनांची रक्कम न आल्यास वाहन विकीसंदर्भातील पूर्ण अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, चंद्रपूर यांचेकडे राहील. व ते वाहन खरेदी करू इच्छिणा–या व्यक्तींवर बंधनकारक राहील.

आदेशान्वये

चंद्रपूर
दिनांक : 20.07.2022

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय,चंद्रपूर

**Vehicle auction N-sheet**